

# चार आश्रमांची आदर्श जीवनशैली

लहानपणी इतिहासाच्या पुस्तकात आपण सर्वांनीच चार आश्रम आणि चार पुरुषार्थांविषयी वाचलेलं आहे. अधूनमधून या गोष्टी आपल्या कानावर पडत असतात. चार आश्रम व चार पुरुषार्थ या संकल्पनांमध्ये माणसाच्या जगण्याचं साधं-सोपं सार सामावलेलं आहे. माणसाचं या धरतीवर कार्य काय आहे, हे समजून घेण्यासाठी आपल्याला या संकल्पनांचा उपयोग होतो. आपल्या धर्मशास्त्राने धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. जन्मभर धर्माने वागायचं हा पहिला पुरुषार्थ आहे. धर्म म्हणजे काय, नीती, नैतिकता. म्हणजेच आपलं आचरण सदैव नैतिक असलं पाहिजे. दुसरा पुरुषार्थ आहे अर्थ. जगण्यासाठी, संसार चालवण्यासाठी अर्थ, म्हणजे पैसा आवश्यक असतो. माणसाने त्याच्या जगण्यासाठी आवश्यक अर्थप्राप्ती नेकीने-नीतीधर्माने केली पाहिजे. माणसाचं तिसरं कर्तव्य आहे ज्ञान, विचार, संस्कृती, परंपरा पुढे नेणं, त्यांचं वहन करणं त्यासाठी त्याने संतती वाढवली पाहिजे, वंश वाढत नेला पाहिजे. यासाठी काम हा तिसरा पुरुषार्थ. योग्य प्रकारे पार पाडून मोक्षप्राप्तीसाठी प्रयोग करणं हा चौथा पुरुषार्थ - मोक्ष. मोक्ष म्हणजे मुक्ती, जीवनातून मुक्ती.

धर्म ही संकल्पना विशाल आहे. तिला अनेक पदर आहेत. त्यात विश्वाचं

रहस्य सामावलेलं आहे, अध्यात्म सामावलेलं आहे. माणसाची ऐहीक आणि पारलौकिक कर्तव्यं सामावलेली आहेत. या कर्तव्यांच्या दृष्टीने पाहिलं, तर मनुष्याची स्वतःसाठी तसंच त्याच्या कुटुंबासाठी काही कर्तव्य असतात, काही समाजासाठी असतात, काही राष्ट्रासाठी कर्तव्य असतात, तर काही समस्त वसुंधरेसाठी असतात. अशा सर्व कर्तव्यांनी माणूस बांधलेला असतो. त्यांना आपण कुटुंब धर्म, शेजारधर्म, समाजधर्म, राष्ट्रधर्म आणि वसुंधराधर्म असं म्हणतो आणि प्रत्येकाने आपापल्या परीने ही कर्तव्यं पेलायची असतात. चार आश्रम आणि चार पुरुषार्थांमध्ये ही कर्तव्ये सामावलेली असतात.

'बूँद बूँद में सागर' असं म्हटलं जातं. याचा अर्थ काय आहे? पाण्याच्या एका थेंबात तेच गुण असतात जे एका मोठ्या नदीत आणि एका मोठ्या महासागरात असतात. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर, पाण्याच्या एका थेंबात तीच गुणवत्ता असायला हवी, जी एका विशाल महासागरात असते. मिठाच्या एका खड्यात हजारो-लाखो कण सामावलेले असतात, या सर्व कणांचे गुणधर्म सारखे असतात. प्रत्येक कणाचा जो गुणधर्म असतो तोच संपूर्ण खड्याचा असतो. विज्ञानात आपण मूलकणांचा अभ्यास केलेला आहे. जे वस्तूमात्रांच्या बाबतीत आहे, तेच मनुष्याच्या बाबतीत आहे. माणूस लहान असो की मोठा त्याचा जीवन मार्ग सारखाच आहे. एकाच मार्गाने साऱ्यांना जीवनाची वाट चालायची असते. चार पुरुषार्थ माणसाला जीवन मार्गाची दिशा दाखवतात. माणसाला जीवनात हे चार पुरुषार्थ योग्य वेळी, योग्य प्रकारे साध्य व्हावेत यासाठी चार आश्रमांची व्यवस्था धर्मशास्त्राने सांगितली आहे. हे चार आश्रम आहेत, एक म्हणजे ब्रह्मचर्याश्रम, दुसरा गृहस्थाश्रम, तिसरा वानप्रस्थाश्रम आणि चौथा संन्यासाश्रम. माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या आयुष्याची विभागणी या चार आश्रमांमध्ये केलेली असते. टक्केवारीच्या भाषेत सांगायचं तर, माणसाचं ३० टक्के आयुष्य ब्रह्मचर्याश्रमात, ४० टक्के आयुष्य गृहस्थाश्रमात, १० टक्के आयुष्य वानप्रस्थाश्रमात, आणि त्यानंतरचं उर्वरित आयुष्य संन्यासाश्रमात अशी सर्वसामान्य विभागणी करता येईल. आजच्या काळात माणसानं जगण्याची ही व्यवस्था मोडीत काढली आहे. पूर्वीच्या काळी लोक या व्यवस्थेचं अनुसरण करीत होते, आणि त्याचे लाभही त्यांना मिळत होते.

पूर्वीच्या काळी बालक जन्माला आल्यानंतर त्याला थोडी-फार समज येईपर्यंत, स्वतःची आणि भोवतालची ओळख होईपर्यंत ते त्याच्या आई-वडिलांजवळ रहात

असे आणि नंतर त्याला गुरूंच्या आश्रमात गुरुकुलात विद्याभ्यासासाठी पाठवलं जात असे. बारा वर्षे गुरुगृही राहून विद्याभ्यासात पारंगत होऊन एका परिपक्व युवकाच्या रूपात तो स्वतःच्या घरी परतत असे. गुरूंच्या आश्रमात राहण्याच्या या काळाला 'ब्रह्मचर्याश्रम' असं संबोधलं जात असे. गुरुकुलात विद्यार्थी धर्म, अर्थ, काम, मोक्ष या पुरुषार्थांचा अभ्यास करत असत. ज्ञानाची मूलभूत बैठक आत्मसात केल्यानंतर त्यांना त्यांच्या आवडीच्या विद्येत पारंगत होता येत असे. भावी आयुष्यात उपयोगी पडेल असं ज्ञान विद्यार्थी गुरुकुलात गुरुंकडून मिळवत असत. विद्यार्थ्यांना गुरुकुलात मिळणारं ज्ञान निव्वळ पुस्तकी नसे, तर प्रात्यक्षिकांतून-प्रत्यक्ष अनुभवातूनही विद्यार्थी ज्ञान ग्रहण करीत असत. आपल्या पूर्वजांपासून संचय होत आलेलं ज्ञान गुरू आपल्या शिष्यांसमोर खुलं करीत असत. आज ज्याला आपण 'केस स्टडी' म्हणतो. म्हणजे एखाद्या प्रकरणाचा सर्व बांजूनी सखोल अभ्यास करणं, असे अभ्यास त्या काळी गुरुकुलात होत असत. एखाद्या विषयावर परिसंवाद, चर्चासत्र होत असत. विद्यार्थ्यांना विद्वानांचा सहवास मिळत असे. विद्वानांची व्याख्यानं ते ऐकत असत. राजे-महाराजे, मंत्री आणि इतर समाज धुरीणांना आश्रमात पाचारण केलं जात असे. ते त्यांचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगत असत. एकीकडे अशाप्रकारे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास घडवला जात असे, तर त्याचबरोबर आश्रमातील सर्व कामं शिष्यांकडून करवून घेतली जात असत. जंगलात जाणं, लाकूड तोडणं, कंदमुळं गोळा करणं, अन्न मिळवणं आश्रमाची साफसफाई करणं, गुरुजनांची सेवा करणं अशी एक ना अनेक कामं शिष्यगण करीत असत. त्यातून त्यांना स्वावलंबनाचे धडे मिळत असत. सकाळी लवकर उठून त्यांना व्यायाम तर करावाच लागत असे, पण अशा कष्टांच्या कामातून मिळणारा व्यायाम त्यांना आरोग्यसंपन्न व सुदृढ बनवत असे. आश्रमात उच्च-निच्च असा भेदभाव केला जात नसे. आश्रमात जसे राजघराण्यातले युवराज आणि उच्चपदस्थांची मुलं शिक्षण घेत असत, तशीच सामान्यजनांची मुलंही शिकत असत. सर्वांना सर्व प्रकारची कामं करावी लागत त्यामुळे परस्परांत बंधुभाव वाढण्यास मदत होत असे. श्रीकृष्ण आणि सुदाम्याची गोष्ट आपल्याला माहीत आहे. श्रीकृष्ण हा राजघराण्यातला तर सुदामा हा एका गरीब ब्राह्मणाचा मुलगा होता. दोघंही बालपणी सांदिपनी ऋषींच्या आश्रमात विद्याभ्यास करत असत. गरीब-श्रीमंत या भेदभावाला आश्रमात थारा नसे. थोडक्यात, गुरुकुलात विद्यार्थ्यांना विविध विद्या जशा शिकायला मिळत असत त्याचप्रमाणे जीवनाचे धडेही मिळत असत. अशाप्रकारे सर्वांगीण विकासाने समृद्ध असे तरुण

जेव्हा स्वगृही परतत असत तेव्हा खऱ्या अर्थाने ते समाजाची, राष्ट्राची संपत्ती बनलेले असत. त्यांच्या ज्ञानाचा, कौशल्याचा लाभ समाजाला मिळत असे. इथे 'ब्रह्मचर्य' या शब्दाचं मोल खूप मोठं आहे, त्याची चर्चा आपण पुढे करणारच आहोत.

विद्या, ज्ञान आणि कौशल्य प्राप्तीनंतर युवक गृहस्थाश्रमात प्रवेश करीत असे. ज्या शाखेत तो पारंगत झाला असेल त्या शाखेशी संबधित व्यवसायात तो उतरत असे. योग्य, अनुरूप व त्याने अंगीकारलेल्या कर्तव्यात जिची त्याला साथ मिळेल अशा स्त्रीशी त्याचा विवाह होत असे. पती-पत्नी या नात्याने गुण्यागोविंदाने संसार करायचा. संतती निर्माण करायची, संततीचं योग्य रीतीनं संगोपन करायचं, सांभाळ करायचा. आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवायचा, वानप्रस्थाश्रम स्वीकारलेल्या आपल्या आई-वडिलांची आपल्या वडिलधाऱ्यांची सेवा करायची. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यायचा, त्यांच्या सूचनांचं पालन करायचं, यथावकाश आपल्या अपत्यांना विद्याभ्यासासाठी गुरुकुलात पाठवायचं तसंच आपल्या वडिलधाऱ्यांच्या संन्यासाश्रमाचा मार्ग सुकर करायचा ही गृहस्थाश्रमातील कर्तव्यं ते पार पाडत असत. हे सारं करत असताना आपलं ज्ञान, कौशल्य, मेहनत यांच्या बळावर समाजात आपलं स्थान निर्माण करणं, आपला व घराण्याचा लौकिक वाढवणं, समाजातील गरजवंताना मदत करणं, धर्मशास्त्राप्रमाणे नीतीचं आचरण करणं, पूजा-अर्चा, यज्ञकर्म करणं या गोष्टी गृहस्थाश्रमी लोक करत असत. समाजाप्रती असलेली आपली कर्तव्यं निभावणं आणि जीवनात स्थैर्य, लौकिक, यश प्राप्त करणं हा गृहस्थाश्रमाचा उद्देश असे.

गृहस्थाश्रमाचा उपभोग घेतल्यानंतर, आपला वंश-आपली पुढची पिढी ज्ञानाने-कौशल्याने परिपक्व झाल्यानंतर या नव्या पिढीकडे सर्व कौटुंबिक भार सोपवून व्यक्ती वानप्रस्थाश्रम करीत असे. वानप्रस्थाश्रम म्हणजे वनात जाऊन राहणं. गृहस्थाश्रमातून निवृत्त झाल्यानंतर पती-पत्नी वनात ऋषीमुनींच्या आश्रमात जाऊन रहात असत. त्यांची मुलं आता सर्व कारभार पाहू लागलेली असत. त्यांना सल्ला देण्याचं, मार्गदर्शन करण्याचं काम वानप्रस्थाश्रमी व्यक्ती करत असत. त्यांच्या गृहस्थाश्रमी जीवनात त्यांना आलेले अनुभव ते त्यांच्या मुलांना सांगत असत. त्याचबरोबर वाडवडिलांपासून चालत आलेलं संचित ज्ञान ते त्यांच्या मुलांना प्रदान करत असत. जशी रेल्वे रूळ बदलते तेव्हा हळूहळू धिम्या गतीने एका रूळावरून दुसऱ्या रूळावर जाते त्याच प्रकारे वानप्रस्थाश्रम काळात एका धिम्या पण निश्चित गतीने, सुव्यवस्थितपणे एका पिढीचा वारसा दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असे.

यावेळी वानप्रस्थाश्रमातील व्यक्ती विश्वस्ताची भूमिका बजावत असे. वानप्रस्थाश्रम ते संन्यासाश्रम हा या दृष्टीने एक मोठा वैचारिक टप्पा होता, असे म्हणता येईल.

आपले पुत्र, कन्या संसाररूपी सागरात व्यवस्थित तग धरू लागल्यानंतर व्यक्ती वानप्रस्थाश्रमातून व्यवस्थित संन्यासाश्रमात प्रवेश करीत असत. या आश्रमात प्रवेश करताना त्यांचं मन निरिच्छ झालेलं असे, जीवन तृप्तपणे जगल्याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यांवर दिसत असे. मनातले मोह आता संपलेले असत. हा माझा, तो परक्याचा हा भेद नाहीसा झालेला असे. दुजाभाव संपलेला असे. 'हे विश्वचि माझे घर' या भावनेने मन भरलेलं असे. व्यक्ती अध्यात्म मार्गात लीन होत असे. इश्वराच्या भजन, कीर्तनात दंग होऊन जात असते. ईश्वराच्या नाम:स्मरणात मग्न होत असे. माणसाच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात तहान-भूकेची फारशी गरज नसते; पण स्वच्छ हवा, स्वच्छ प्रकाश आणि शुद्ध निसर्गाच्या सान्निध्याची गरज असते. त्यामुळे मन सतत प्रसन्न रहातं. निसर्गाचं सान्निध्य आणि परमेश्वराचं चिंतन यामुळे मन शांत व आनंदी बनतं. अशा आनंदी मनाने या जगाचा निरोप घेणं ही संन्यासाश्रमाची इतिश्री असायची. थोडक्यात, ब्रह्मचर्याश्रमात ज्ञान-विद्या ग्रहण, गृहस्थाश्रमात कौटुंबिक जीवन, वानप्रस्थाश्रमात ज्ञान, संस्कार, परंपरांचं हस्तांतरण आणि संन्यासाश्रमात जीवनमुक्ती अशी एक आखीव-रेखीव जीवनशैली कोणे एकेकाळी आपल्या समाजात प्रचलित होती. हे एकप्रकारे आयुष्याचं व्यवस्थापन होतं. जगणं अर्थपूर्ण बनवण्याचा, जगण्याचा मूल्य वाढवण्याचा, जगणं समाजासाठी राष्ट्रासाठी व समस्त विश्वासाठी उपयुक्त बनवण्याचा हा एक मंत्र होता. ही एक सुनियोजित परंपरा होती व लोक या परंपरेचं मनापासून अनुसरण करत होते.

आज या परंपरेचं काय झालं आहे? इतिहास म्हणून या गोष्टी आपल्याला आज शिकवल्या जातात. मात्र, त्याकडे धर्माच्या चौकटीतून पाहिलं जातं. धर्माची एक परंपरा एवढंच आपल्याला माहीत असतं आणि म्हणूनही कदाचित आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. काळ बदलला, जग बदललं, आज या अशा पुराण परंपरांना कशाला महत्त्व द्यायचं असं आपल्याला वाटतं. आज आपण या चार आश्रमांपैकी फक्त गृहस्थाश्रमाचं नाव घेतो आणि हा आश्रम निभावण्यातच धन्यता मानतो; पण आज आपल्या समाजात निर्माण झालेल्या समस्या, जगण्याच्या संदर्भात निर्माण झालेली दिशाहीनता पाहिली. समाजात घडणाऱ्या चुकीच्या गोष्टींचं वाढतं प्रमाण पाहिलं तर आपण एक आदर्श जीवनशैली सोडून आधुनिकतेच्या नावाखाली कोणत्या

मार्गाला चाललो आहोत, असा प्रश्न पडेल. 'जुनं ते सगळंच सोनं' असा दावा करायचा नाही, पण जुन्यातलं जे उपयुक्त आहे त्याकडे पुन्हा एकदा वळून पाहण्यास काय हरकत आहे?

ब्रह्मचर्याश्रम या संकल्पनेतील 'ब्रह्मचर्य' या शब्दाला विशेष मोल आहे, असं आधी म्हटलं आहे. ब्रह्मचर्य म्हणजे आसक्ती, अभिलाषा, मोह यापासून दूर राहणं. विद्याभ्यासात चित्त एकाग्र व्हायचं असेल, तर विद्यार्थ्याने आसक्ती आणि मोहापासून दूर राहिलं पाहिजे. या दृष्टीने ब्रह्मचर्याश्रमात शिक्षण आणि ब्रह्मचर्याची सांगड घालण्यात आली होती. विद्यार्थी आपल्या घरापासून, गावापासून दूर एखाद्या गुरुकुलात शिक्षण घेत असे. त्यामुळे आई-वडिलांची माया, त्यांचं कृपाछत्र यापासून तो दूर असे. त्याच्या शिक्षणात आई-वडिलांच्या प्रेमाचा, मायेचा व्यत्यय येत नसे त्याचप्रमाणे कुटुंबाच्या बऱ्या-वाईट गोष्टींच्या परिणामांपासून त्याचा बचाव होत असे व त्याचा विद्याभ्यास सुरळीत चालत असे. मुलं वयात येताना पौगंडावस्थेतून जातात. त्यांच्या लैगिंक जाणिवा विकसित होत असतात. विरुद्धलिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण वाटत असते. या आकर्षणामुळे मुलांची विद्याभ्यासातील एकाग्रता भंग पावते. विद्यार्थी दूर वनात गुरुकुलात राहात असल्याने समवयस्क विरुद्धलिंगी व्यक्ती दृष्टीस पडण्याची किंवा संपर्कात येण्याची शक्यता नसे. त्यामुळे भावनांवर नियंत्रण मिळवणं व निग्रहाने विद्याभ्यास करणं विद्यार्थ्यांना शक्य होत असे व ते उत्तमरीत्या पारंगत होत असत.

आज परिस्थिती उलटी दिसते. जन्माला आल्यापासून मुलं आई-बापाला आणि आई-बाप मुलाला चिकटून असतात. ते एकमेकांपासून दूर होत नाहीत. आई-बाप मुलांना अजिबात स्वतंत्र सोडत नाहीत, परिणामी मुलं आई-वडिलांच्या प्रेमाच्या आहारी जातात. स्वावलंबन त्यांच्या अंगवळणी पडत नाही. एखाद्या घटनेला, प्रसंगाला सामोरं जाण्याचं धाडस त्यांच्यात निर्माण होत नाही. ऊन-पाऊस-वारा झेलण्याचं बळ त्यांना प्राप्त होत नाही, समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांमध्ये त्यांचं मिसळणं होत नाही त्यामुळे ते समाजाशी फटकून राहतात, समाजाशी आपलं काही देणं-घेणं आहे याचे संस्कार त्यांच्यावर होत नाहीत. आई-वडिलांची मतं, विचार, धारणा भूमिका याच त्यांना महत्त्वाच्या वाटतात; कारण त्यांची दुसरी बाजू त्यांना माहीत नसते. मुलं एकारलेली, एककल्ली बनतात. आज हे चित्र आपल्याला स्पष्टपणे दिसत आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे आज मुले-मुली एकत्र दिसतात. मुला-मुलींच्या शाळा वेगवेगळ्या असल्या तरी जाता-येता मुलं-मुली एकमेकांना पाहतात. पौगंडावस्थेतील मुलं-मुली परस्परांकडे आकर्षित होतात आणि त्यांचं अभ्यासातून लक्ष उडतं. महाविद्यालयात शिकणारी तरुण मुलं-मुली अनेकदा आकर्षणालाच प्रेम समजण्याची चूक करतात. आजकाल लिव्ह-इन-रिलेशनशिपच्या नावाखाली तरुण-तरुणी लग्नाशिवाय एकत्र राहताना दिसतात. प्रेम-आकर्षण हा आपला विषय नाहीये, मात्र यामुळे एकाग्रता भंग पावते व विद्यार्थी अभ्यासात मागे पडतात, अनेक विद्यार्थी शिक्षण अर्ध्यावर सोडून देतात आणि ब्रह्मचर्याश्रम पूर्ण न करताच गृहस्थाश्रमात प्रवेश करतात. अर्धवट शिकलेला माणूस संसारातल्या जबाबदाऱ्या नीट पेलू शकत नाही, त्यामुळे कुटुंबात कलह निर्माण होतो व याची परिणती घटस्फोटात होते. संसारात पती-पत्नी दोघंही असफल होतात. याचं प्रमाण आजकाल वाढत असल्याचं दिसून येतं.

हे जरी खरं असलं तरी आज बहुसंख्य लोक गृहस्थाश्रमाचं जगणं नेटाने जगताना दिसतात. अर्थात, गृहस्थाश्रमाचं पालन या अर्थाने त्यांनी गृहस्थाश्रमात प्रवेश केलेला असतोच असं नाही; तर नैसर्गिकपणे ते गृहस्थ बनतात आणि त्यातच गुरफटून जातात. मी, माझं घर, माझा संसार, माझी पत्नी, माझी मुलं अशा संकुचित वृत्तीने ते गृहस्थाश्रमात रममाण होतात. महान तत्त्ववेत्ते पार्थसारथी यांनी म्हटलं आहे की, तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या सुखासाठी काही करता, धडपडता, हे ठीक आहे, पण हाच तुमच्या जीवनाचा अंतिम उद्देश आहे काय? जर तुमच्या शेजाऱ्यांचं मुल रडत असेल, त्याचे आई-वडील कुठे बाहेर गेले असतील, त्यांना परतण्यास उशीर होणार असेल तर तुमच्या मुलाच्या खाऊमधला एक छोटासा हिस्सा तुम्ही त्या मुलाला देणार नाही का? तेवढी दानत तुम्ही ठेवणार नाही का? कुणाच्या वाईट प्रसंगात तुम्ही तनाने, मनाने आणि धनाने साहाय्य केलं पाहिजे, तरच तुमच्या वेळ-प्रसंगात लोक तुमच्यासाठी धावून येतील. परस्पर सहकार्याची भावना जोपासली पाहिजे. केवळ स्वतःच्या कुटुंबापुरतं न पाहता शेजारधर्म, समाजधर्म व राष्ट्रधर्म यांचं पालन केलं पाहिजे; तर खऱ्या अर्थाने तुम्ही गृहस्थाश्रम जगलात असं म्हणता येईल.

आजकाल माणूस गृहस्थाश्रमाच्या इतक्या अधीन झाला आहे की त्याच्यातून तो सुटता सुटत नाही. वानप्रस्थाश्रमाकडे जाण्याचं तो नावही घेत नाही. संन्यासाश्रम तर दूरच राहीला. एखादा राजकीय नेता मृत्युशय्येवर पडलेला असतो, तरीही

उमेदवारीचा अर्ज भरण्याचा त्याचा मोह सुटलेला नसतो. मृत्युशय्येवरच तो अर्जावर सही करतो. धर्मराजाला एकदा विचारण्यात आल होतं, 'माणूस पदोपदी काय विसरतो?' धर्मराजाने उत्तर दिलं होतं, 'माणूस पदोपदी मृत्यूला विसरतो.' मृत्यू समोर दिसला की माणसाचं अवसान गळतं आणि मृत्युशिवाय दुसरा कुठलाही विचार त्याच्या मनाला शिवत नाही. मला जर कोणी सांगितलं की पुढच्या चोवीस तासात माझा मृत्यू होणार आहे. तर मला काही सूचणारचं नाही. तहान-भूक देखील लागणार नाही. जीवनात मी काय केलं याचा आढावा घेण्याचंही भान मला राहणार नाही. हे असं घडतं, कारण आपल्या जीवनाचा लेखाजोखा मांडण्याइतकी स्पेसच आपण ठेवत नाही. आपल्या जीवनाचं सिंहावलोकन करणं हे इतरांसाठी नव्हे, तर स्वतःसाठी महत्त्वाचं आहे. ही 'स्पेस' वानप्रस्थाश्रमात मिळू शकते.

आपण आपलं आयुष्य कशा पद्धतीने घालवलं? आपल्या हातून चुका झाल्या असतील तर त्या का झाल्या? आपल्याला एखादं यश मिळालं असेल तर ते का मिळालं? त्याची गुरुकिल्ली काय होती? आपल्या कृतिशील जगण्यातून बाहेर पडलो तरच आपल्याला असा मागोवा घेता येईल. आपल्या चुकांची प्रांजळ कबुली देता येईल आणि आपल्या यशातल्या भागीदारांना त्यांच्या वाट्याचं श्रेय देता येईल. त्याचप्रमाणे आपल्या पुढच्या पिढीसमोर आपलं जीवन मांडून आयुष्याच्या खाचा-खोचा त्यांना दाखवता येतील. यातून एकप्रकारे त्यांचं शिक्षण होईल; पण आजकाल माणसं अशी जगतात की, त्यांच्याबरोबरच त्यांचं नावही रसातळाला जातं, हे सर्वस्वी चुकीचं आहे.

आजच्या काळात वानप्रस्थाश्रम कसा शक्य आहे? घरदार सोडून जंगलात कोण जाणार? असा प्रश्न लोक विचारतील. मात्र, आपण आपलं घर सोडून स्वेच्छेने एखाद्या निसर्गरम्य परिसरातील वृद्धाश्रमात जाऊ शकतो. मुलांनी वृद्धांना जबरदस्तीने दूर ठेवण्याचं ठिकाण म्हणजे वृद्धाश्रम अशी वृद्धाश्रमाची पूर्ण नकारात्मक भावना समाजात निर्माण झाली आहे. याचं कारण घरादाराचा, संपत्तीचा, मीपणाचा मोह. तो अखेरपर्यंत सुटत नाही. यात अनेक गुंते आहेत, हे मान्य आहे पण स्वेच्छेने आपण या मोहातून मुक्त होऊ शकतो व विरक्त आयुष्य जगू शकतो. पूर्वीच्या काळी राजे-महाराजे देखील सर्वस्वाचा त्याग करून वानप्रस्थाला जात असत. आयुष्यात आपण सतत मालकाच्या भूमिकेत राहण्यापेक्षा योग्यवेळी विश्वस्ताची भूमिका स्वीकारली पाहिजे. एखाद्या चांगल्या वृद्धाश्रमात आपल्या समवयस्क साथीदारांबरोबर हास्य-

विनोद करत, सुख-दुःखाची देवाण-घेवाण करत, परमेश्वराचं चिंतन व नामस्मरण करत आपण शांतपणे उर्वरित आयुष्य जगू शकतो. आपल्या मुला-बाळांना त्यांचा संसार करू द्यावा, त्यांना संसारात रममाण झाल्याचं आपण आनंदाने पाहावं. संसाराचा आनंद आपला उपभोगून झाला आहे. आता त्यांना तो उपभोगू द्यावा. आपण या चक्रातून बाहेर पडलं पाहिजे. मात्र, आज लोक सापशिडीच्या खेळाप्रमाणे पुन्हा पुन्हा संसारात पडत राहतात. काही काळ हे योग्य असतं, पण पुढे मात्र शिथिल होतात. लोकच तुम्हाला नाकारू लागतात. मग वाट्याला वैफल्य येतं, हे कितपत योग्य आहे?

जीवनात चारही आश्रम योग्य रीतीने जो पार पाडतो, तोच माणूस असं मला ठामपणानं वाटतं. शेणाच्या पोयात एखादी माशी जशी गुंतून पडते, तसा माणूस गृहस्थाश्रमात गुंतून पडेल तर त्याचं भावी कल्याण अवघड आहे. वानप्रस्थाश्रमातील, संन्यासाश्रमातील जीवनाचा निरामय आनंद त्याला मिळणार नाही. मनाच्या मुक्ततेचा आनंद त्याला घेता येणार नाही. आध्यात्मिक जाणीवेतल्या पारलौकिक आनंदाचं वर्णन करता येणं शक्य नाही, तो आनंद अवर्णनीय आहे. चार आश्रम जगणारा माणूस चारही पुरुषार्थ प्राप्त करतो. त्याचं जीवन सफल होतं.

आजच्या काळात या आश्रमव्यवस्थेचं महत्त्व काय? पर्यावरणाच्या दृष्टीने विचार करा, हे महत्त्व तुम्हाला स्वतःलाच पटेल. ब्रह्मचर्याश्रमात विद्यार्थी गुरुगृही निसर्गाच्या सान्निध्यात राहतो, निसर्गाचं जतन, संवर्धन करतो. हा काळ आपण पंचवीस वर्षांचा मानला तर एक पिढी आपली पंचवीस वर्षं या कामाला देईल. त्यांच्यानंतर दुसरी पिढी या कामात गुंतलेली असेल. हीच गोष्ट वानप्रस्थाश्रमाची. माणूस ५१ व्या वर्षी वानप्रस्थाश्रमास गेला तर त्याचं पुढचं सर्व आयुष्य तो पर्यावरणाच्या संवर्धनात घालवेल. परिणामी पर्यावरण रक्षणाचं-संवर्धनाचं काम अखंडितपणे चालू राहील आणि आज प्रदूषणाने ज्या समस्या उभ्या केल्या आहेत, त्याला बऱ्याच प्रमाणात अटकाव होऊ शकेल.

हे खरं आहे की, आजच्या काळात पूर्वीसारखी आश्रमव्यवस्था राबवणं अशक्य आहे, पण आपण याचा संकल्पना म्हणून विचार केला पाहिजे. आज प्राथमिकपासून उच्चशिक्षणापर्यंत शिक्षणसंस्था शहरांत केंद्रित झाल्या आहेत. या शिक्षणसंस्था शहरांतून गावांमध्ये नैसर्गिक वातावरणात नेणं, तिथे विद्यार्थ्यांची गुरुकुल पद्धतीने राहण्याची, शिक्षणाची सोय करणं, निसर्गाच्या जतन-संवर्धनाच्या कामात त्यांना जोडून घेणं हे

आजही शक्य आहे, हीच गोष्ट वृद्धाश्रमांची. ग्रामीण भागात प्रसन्न ठिकाणी वृद्धाश्रम निर्माण करता येतील किंवा निवृत्तीनंतर लोक आपापल्या गावाकडे परत जातील, शहरात वाढलेले लोकही ग्रामीण भागात छोटी घरं बांधून राहू शकतील. कल्पना करा, या गोष्टी वास्तवात आल्या तर, शहरावरचा ताण किती प्रमाणात कमी होईल? शहरं सुखाचा श्वास घेऊ शकतील! म्हणजेच उपयुक्ततेच्या दृष्टीनेही या व्यवस्थेचा विचार करण्यास हरकत नाही. त्याला धर्माचं लेबल डकवायचीही गरज नाही. शासनाने याबाबतीत पुढाकार घेतला पाहिजे.

सरतेशेवटी इतकंच सांगेन, आपल्या पूर्वजांनी कधी काळी एक जीवनशैली विकसित केली, त्यात व्यक्तीचा विचार होता, कुटुंबाचा विचार होता, समाजाचा विचार होता. त्यात आयुष्याची सुनियोजित विभागणी होती. समाजाची सर्व चाकं घर्षण न होता फिरावीत अशी सुविधा होती. समाजात मोठ्यांविषयी आदर, लहानांविषयी आस्था, प्रेम या व्यवस्थेत अंतर्भूत होतं. एका पिढीची निकोप वाढ, दुसऱ्या पिढीचा खंबीर आधार, सत्तेचं सुव्यवस्थित हस्तांतरण आणि पर्यावरणाचा समतोल हे सारं कसब या जीवनशैलीनं साधलं होतं. लौकिकाकडून अलौकिकाकडे जाणारा मार्ग या जीवनशैलीने दाखवला होता. या मार्गाचं पालन आपण का करू नये?